Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७६ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.९ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शेतकरी उत्पादक कंपन्या शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल-केंद्रिय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी

## विदर्भामध्ये उद्योग उभारणीत चंद्रपूर जिल्हा अव्वल स्थानी







**वरोरा । प्रतिनिधी**

शेतीसाठी आवश्यक बियाणे, खते, कीटकनाशकांची उपलब्धता व सामूहीक शेतीच्या माध्यमातून शेतमालाला बाजारपेठ मिळवून देवून शेतीशी निगडित उद्योग उभारणीत उत्पादक कंपन्या शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. क्रीडा संकुल, वरोरा येथे विदर्भ प्रादेशिक शेतकरी परिषद व कृषी प्रदर्शनीच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, प्रकल्प संचालक (आत्मा) प्रिती हिवरकर, वैनगंगा व्हॅली शेतकरी उत्पादक महासंघाचे नरेंद्र जिवतोडे, कांचनी फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे पदाधिकारी तसेच जयकुमार वर्मा, देवराव भोंगळे, राहूल पावडे, अतुल देशकर, चंदनसिंह चंदेल, हरीश शर्मा, संध्या गुरनुले आदी उपस्थित होते.

वैनगंगा फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून मागील २ वर्षात विशेषत: चंद्रपूर आणि वरोरा तालुक्यात उत्कृष्ठ काम झाले याचा आनंद आहे, असे सांगून केंद्रीय रस्ते वाहतुक व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, जिल्ह्यातील ५२ शेतकरी उत्पादक कंपन्या महासंघाला जुडल्या आहेत. महासंघाच्यावतीने सर्व कंपन्यांना नवनवीन योजनांची माहिती देऊन नवीन उद्योग उभारणीसाठी सातत्याने प्रयत्न केल्या जात आहे. महासंघामध्ये जिल्ह्यातील १५ तालुक्याचे १५ संचालक आहेत आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे उद्योग कसे उभे करता येईल? हा त्यांचा प्रयत्न आहे. स्मार्ट प्रकल्पात प्रकल्प संचालक आत्मा विभागाच्या वतीने विदर्भामध्ये उद्योग उभारणीत चंद्रपूर जिल्हा अव्वल स्थानी आहे, याचा अभिमान असल्याचे ते म्हणाले. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी त्यांचे कार्य वाढवावे, त्यातून शेतकऱ्यांचा नक्कीच विकास होईल, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. ५२ शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये ४५ हजार शेतकरी कुटुंब या महासंघाला जोडले आहे. फार्मर प्रोड्युसर कंपन्या शेतकऱ्यांचे भवितव्य आहे. याकरीता सर्वांनी एकत्र येऊन प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यांना नेतृत्व देऊन फार्मर प्रोडूसर कंपन्या तयार केल्यास शेतकऱ्यांचा माल थेट बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होईल व दलालाच्या कचाट्यातून सुटका होईल. तसेच विविध उत्पादनाला भारतीय बाजारपेठ तर मिळेलच पण निर्यात देखील मोठ्या प्रमाणावर होईल. नागपूर येथील ग्रो व्हिजनमध्ये जसे मार्गदर्शन झाले त्याचप्रमाणे वर्षभर मार्गदर्शन मिळेल अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले. केंद्रीय मंत्री गडकरी पुढे म्हणाले, जिल्ह्यामध्ये जसे फार्मर प्रोडूसर कंपन्या तयार केल्या गेल्या आहेत त्याचप्रमाणे, नाशिकमध्ये सह्याद्री फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेशन तयार करण्यात आले आहे. या कंपनीने १३०० कोटी रुपयाचे द्राक्षे निर्यात करुन येथील शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला. सह्याद्री कंपनीसारखेच जिल्ह्यात काम व्हावे, तरच शेतकरी समृद्ध, संपन्न आणि कर्जमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही. हिंगोलीमध्ये गोदावरी फॉर्म, सांगली येथे झुकेरी फॉर्म, सातारा येथे ग्रो व्हिजन फार्मर कंपनी यासारखेच, महाराष्ट्रात यशस्वी प्रयोग जिल्ह्यात यशस्वी कसे करता येईल? यासाठी सर्वांनी विचार करण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. फार्मर प्रोडूसर कंपन्याकरीता दोन योजना आहेत. यामध्ये १० हजार शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी केंद्र पुरस्कृत योजनेत ७ हजार कोटी रुपयांची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. शेतकऱ्याचा माल थेट निर्यात करण्यासाठी वर्धा जिल्ह्यात पोर्ट ट्रस्ट उभारण्यात येत आहे. या पोर्टच्या माध्यमातून जगात माल निर्यात करता येईल यामुळे शेतकऱ्यांना अधिकच फायदा मिळेल. जगाच्या मार्केटमध्ये यशस्वी व्हायचे असल्यास उत्पादनात १०० टक्के गुणवत्ता असावी. उत्तम क्वालिटी, पॅकेजिंग, ब्रँडिंग असावे. येणाऱ्या काळात या पोर्टवरून देशाच्या कानाकोपऱ्यात माल निर्यात करण्यासाठी व्यवस्था केली जाईल. या कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांचा माल पॅकेजिंग करून विकल्यास दीडपट भाव शेतकऱ्यांना मिळेल व शेतकरी संपन्न व समृद्ध होईल. सर्वांच्या प्रगती व विकासाकरीता मदर डेअरीला विदर्भात आणले आहे. मदर डेअरीच्या कच्च्या दुधाची खरेदी साडेचार लाख लिटर आहे. हि दूध खरेदी ३० लाख लिटरवर नेण्याचे स्वप्न असल्याचे ते म्हणाले. विदर्भातील दूध चांगला भावाने खरेदी केल्या जाईल, त्यामुळे शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी. नागपूरला सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल फॉर काऊ उघडण्यात येत आहे. व्हेटर्नरी युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने अशाचप्रकारचे मोठे गाईचे हॉस्पिटल चंद्रपूर जिल्ह्यात व्हावे यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी करावी. मदर डेअरीसाठी अनेक योजना तयार करण्यात येत आहे. यासाठी राज्य व केंद्र शासन निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही ते म्हणाले. बुट्टीबोरीमध्ये ६५० कोटी रुपये खर्च करून मोठा प्लांट उभा राहत आहे. ज्यामध्ये विविध खाद्यपदार्थ तयार करण्यात येऊन आतंरराष्ट्रीय बाजारात निर्यात करण्यात येईल. या खाद्यपदार्थासाठी लागणारे ३० लाख लिटर दूध विदर्भ व मराठवाड्याच्या जिल्ह्यातून नागपूरला येणार असून दुधाचा महापूर विदर्भात तयार करण्याकरीता सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले. दुग्धउत्पादन जिल्ह्यात वाढावे यासाठी १२ लाख गायी राज्य सरकार देणार आहे. गोटफार्मच्या धर्तीवर काऊ फार्म तयार करावा व दुध उत्पादनाच्या वाढीस चालना द्यावी. वर्षभर हिरवा चारा मिळाल्यास दूध उत्पादन वाढेल यासाठी फार्मर प्रोड्युसर कंपन्यांनी पशुखाद्यासाठी पुढाकार घ्यावा. विदर्भात ३० लाख लिटर दुधाचे उत्पादन होत असेल तर पशुखाद्य देखील विदर्भातच व्हावे या दृष्टीने प्रयत्न करावे. चांगल्या क्वालिटीचे पशुखाद्य कमी दरात विकल्यास त्याचा फायदा देखील शेतकऱ्यांना होईल याकरीता २० ते २५ पशुखाद्याचे कारखाने लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. पुर्व विदर्भात साडेसहा हजार मालगुजारी तलाव आहेत. या तलावात मत्स्य व्यवसाय केल्यास करोडोने उत्पन्न वाढेल. येणाऱ्या काळात मत्स्य उत्पादनाला सामोरे जायचे आहे. तसेच गहू, तांदूळ, कापूस लावून शेतकऱ्यांचे भले होणार नसून यासाठी क्रॉप पॅटर्न बदलण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.प्रस्ताविकेत बोलतांना वैनगंगा व्हॅली शेतकरी उत्पादक महासंघाचे नरेंद्र जीवतोडे म्हणाले, विदर्भस्तरीय शेतकरी परिषद व कृषी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी १५ तालुक्यातील संचालकांनी मिळून निर्णय घेतला की, १५ ही तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या एका सूत्रात बांधून त्या कंपन्यांना प्रशिक्षित करून तळागाळापर्यंत शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करायचा. जिल्ह्यात स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून २४ प्रकल्प उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी साधारणतः दहा प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले आहे. विशेष म्हणजे, कांचनी शेतकरी उत्पादक कंपनीचे ५० कोटी रुपयाचे टर्नओव्हर चालू झाले आहे. जिनिंग तसेच सर्व प्रक्रिया उद्योग सुद्धा सुरू झाले असल्याचेही ते म्हणाले.

# राज्याचे नवे हवाई वाहतूक धोरण लवकरच-उपमुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्याचे नवे हवाई वाहतूक धोरण लवकरच प्रत्यक्षात येणार असून त्यात हवाई वाहतूक क्षेत्राला प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदींचा अंतर्भाव असणार आहे. राज्याच्या हवाई वाहतुकीसाठी ही एक नवी सुरुवात असेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतातील हेलिकॉप्टरच्या देखभाल, दुरुस्ती व तपासणीसाठी (एमआरओ) एअरबस हेलिकॉप्टर्स आणि इंडामेर यांच्यात झालेल्या करारानुसार मिहान येथील एमआरओ केंद्राचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारचा हवाई वाहतूक क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न आहे. यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू असून अनेक योजना अंमलात येत आहेत. देशातील देखभाल, दुरुस्ती व तपासणी सुविधा केंद्राचा (एमआरओ) वस्तू व सेवा कर हा १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. या धोरणामुळे हवाई क्षेत्राशी निगडीत अनेक कंपन्या एमआरओ केंद्र सुरू करण्यासाठी पुढे येत आहे. देशात नवीन २७ केंद्रे




सुरू झाली असून यापैकी अनेक सुविधा केंद्रे महाराष्ट्रात आहेत. नागपुरातील आंतरराष्ट्रीय कार्गो हबसाठी अनुकूल हवाई वाहतूक धोरण प्रत्यक्षात साकारण्यास हे केंद्र सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास उपमुख्यमत्र्यांनी व्यक्त केला.जगात हेलिकॉप्टरचा वापर मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सुविधा, पर्यटन, कायदा व सुव्यवस्था या बाबींसाठी होत आहे. राज्याच्या नवीन वाहतूक धोरणात एमआरओ, विमानतळांच्या धर्तीवर हेलिपॅडची निर्मिती या बाबींचा अंतर्भाव राहील. देशात हवाई वाहतूक क्षेत्राची लक्षणीय वाढ होत असून याचा राज्याला लाभ होण्याची गरज यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली.खासदार प्रफुल्ल पटेल, एअरबस हेलिकॉप्टरच्या ग्राहक सहाय्य सेवा विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष रोमेन ट्रॅप, इंडामेर प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक प्रजय पटेल, एअरबस भारत व दक्षिण आशियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रेमी मेलार्ड आणि एअरबस भारत व दक्षिण आशियाच्या हेलिकॉप्टर विभागाचे प्रमुख सनी गुगलानी आदी यावेळी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे उद्या नागपुरात उद्घाटन

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे आज शनिवार (दि.०९) रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार असून या कार्यक्रमाला केंद्रीय परिवहन, महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे 'कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र'हे ब्रीद समोर ठेवून आयोजित नमो महारोजगार मेळाव्याला सकाळी १०.३० वाजता सुरुवात होणार आहे. विदर्भातील बेरोजगारांसाठी महत्त्वाचा असणारा हा

नमो महारोजगार

महारोजगार मेळावा दि. ९ व १० डिसेंबर असे दोन दिवस चालणार आहे. जास्तीत जास्त बेरोजगारांनी या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता, व नाविन्यता विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन., विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगंबर दळवी यांनी केले आहे.

# बालविकास प्राथमिक शाळेत विज्ञान मेळावा संपन्न

**मुल । प्रतिनिधी**

समाज सुधारक शिक्षण प्रसारक मंडळ मुल द्वारा संचालीत बालविकास प्राथमिक शाळा मुल येथे ४ डिसेंबर ला विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते . या विज्ञान मेळाव्यात इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विज्ञान मेळाव्याचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता अनिल बुटे यांचे हस्ते करण्यात आले. या विज्ञान मेळाव्यात, सेक्युरिटी अलार्म,मार्बलिंग आर्ट,भूकंप सूचक यंत्र,सौर विद्युत, होलोग्राम,सौर माला, ग्रहणावर आधारित समज-गैरसमज,वॉटर पंप,पाणी अडवा पाणी जिरवा,सौर ऊर्जेची साठवणूक, जलशुध्दीकरण यंत्रणा यावर तसेच इतर काही विषयावर आधारित एकूण २० प्रतिकृतींचा समावेश होता. उपरोक्त प्रतिकृतींचे परीक्षण मान. शैलेश देवाडे ,सहायक शिक्षक नवभारत कन्या विद्यालय, मूल यांनी केले. शालेय स्तरावर आयोजित बाल विज्ञान मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीला चालना मिळते. विद्यार्थ्यांची शोधक वृत्ती वाढते. तंत्रज्ञान विकसित होत असते असे मोलाचे मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता बटे यांनी उद्घाटन प्रसंगी केले. सदर मेळाव्याला इयत्ता १ ते ८ वर्गातील पालकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या जिज्ञासू वृत्तीचा गौरव केला. तसेच कौतुकाचा अभिप्राय नोंदवला. तसेच माजी विद्यार्थ्यांनी सुधा सदर मेळाव्याला भेट देऊन शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच या बाल विज्ञान मेळाव्याला वार्ताहर अमित राऊत, सतिश राजुरवार,धर्मेंद्र सुत्रपवार यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. अश्या प्रकारे या बाल विज्ञान मेळाव्याचे यशस्वीपणे शाळेत आयोजन करण्यात आले.



# ही संधी पुन्हा येणार नाही,ही आपली पहिली आणि शेवटची संधी - मनोज जरांगे पाटील

**उमरखेड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे यासाठी मागील अनेक दिवसांपासून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी मोठमोठे आंदोलन उपोषण केलेत आज दिनांक सात डिसेंबर रोजी येथील गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालयाच्या प्रांगणात विराट सभेतून जरांगे पाटील यांनी बोलताना ही आपली पहिली आणि शेवटची संधी अशी संधी पुन्हा येणार नाही या संधीचं सोनं करा महाराष्ट्रातील सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या ही आपली मागणी आहे व तो आमचा हक्क आहे .महाराष्ट्रभरात मराठा समाजाला आरक्षण मिळावा म्हणून महाराष्ट्र सरकारला दिनांक चोवीस डिसेंबर पर्यंत अवधी देण्यात आल्याचे सांगितले जर आरक्षण मिळालं नाही तर पूर्ण सकल मराठा समाजाला सोबत घेऊन पुन्हा एकदा आंदोलन उभं करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले आरक्षण मिळेपर्यंत एक इंच ही मागे हटणार नाही असा शब्द जरांगे पाटील यांनी आपल्या सभांमधून दिला आहे यामुळे मराठा समाजाचा आंदोलन येत्या काळात अधिक आक्रमक होण्याचे चिन्ह आहेत. आत्तापर्यंत ३५ लाख मराठा समाजांना कुणी प्रमाणपत्र देण्यात वाटप करण्याचे येत असल्याचे सांगितले .दुसरीकडे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिल्यास म्हणजे ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याला मंत्री



छगन भुजबळ यांनी विरोध केला असल्याचे बोलून कडाडून हल्लाबोल केला पुढे बोलताना छकन भुजबळ ओबीसी आणि मराठा समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करीत आहेत त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील मराठा आणि ओबीसी समाज एकमेकांच्या मागण्यांच्या विरोधात उभे टाकले आहेत . सरकारला उद्देशून बोलताना मंत्री छगन भुजबळ सरकारमध्ये राहून मराठा आरक्षण विषयी जर विरोध करत असेल तर त्याला मराठा समाज माफ करणार नाही यावरून दोन जातीमध्ये राजकारण करणे करू नये असाही भुजबळांना खोचक सल्ला दिला मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याच्या निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला यानंतर आता मराठा समाज हा मुळातच कुणबी आहे असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला त्यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन दिनांक २४ डिसेंबर पर्यंत आरक्षण दिला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा हा इशाराही दिला .हा प्रश्न दोन समाजाच्या आरक्षणाबाबतीतला सामाजिक विषय असला तरी यावरून राजकारण होताना दिसत आहेत त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत तर लोकसभा आणि विधानसभा च्या निवडणुकीत तोंडावर आले आहेत त्यामुळे मराठा विरुद्ध ओबीसी अशी या वादाचा राजकीय फायदा कोणाला होऊ शकतो हे आपणास माहित आहे अशी बोलले .२४ डिसेंबर पर्यंत आम्ही शांत राहणार आहो जर आरक्षण मिळाला नाही तर त्यांच्या परिणाम सरकारला भोगावे लागणार छगन भुजबळ यांनी एकूण मराठा समाजावर अन्याय केला तर याद राखा भुजबळ जातिवाद करत आहे सत्तेत असलेल्या मंत्र्यांनी कोणत्याही जातीची मागणी करता येत नाही तसेच आरक्षण असणाऱ्या मराठ्यांनी आरक्षण नसणाऱ्या मराठ्यांच्या पाठीमागे उभे राहावा एकजूट राहा हीच योग्य वेळ आहे पुन्हा येणार नाही आरक्षणासाठी एकजूट राहा भविष्यासाठी लेकरांच्या भविष्यासाठी एकजूट राहा तसेच भुजबळ यांनी ३५ ते ४० वर्ष सत्ता भोगली उच्च दर्जाचे मंत्री असलेले गोरगरिबांच्या लेकरांच्या आरक्षणाच्या आड येत आहे .शिंदे समितीने मराठ्यांचे पुरावे शोधणे सुरू केलेले आहेत ३५ लाख नोंदी सापडले असून प्रमाणपत्र ही वाटप करण्यात येत आहे परंतु आम्हाला सरसकट मराठ्यांना आरक्षण मिळायला पाहिजे सरकारला एक महिन्याची कालावधी मागितली दोन वेळा कालावधी दिली परंतु सरकारने आरक्षण दिले नाही येत्या २४ डिसेंबर रोजी सरकारने आरक्षण दिले नाही तर याचे परिणाम सरकारला भोगावे लागणार असेही सांगितले तसेच सकल मराठा समाज बांधवांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी विनंती केली .मराठ्यांना यापूर्वी आरक्षण समजलं नाही तर आत्ता आरक्षण समजलं आहे यासाठी तरुणांनी व्यसनापासून दूर राहून एकजूट राहून ही आलेली संधी गमू नये असे सांगितले .

## राज्य सरकार शेतकरी विरोधी:शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील स्थगन प्रस्ताव नाकारला–नाना पटोले

**नागपूर**–अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते त्याची मदत अजून मिळालेली नाही आणि आता पुन्हा गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना भरीव मदत मिळावी यासाठी काँग्रेस पक्षाने स्थगन प्रस्ताव दिला होता पण भाजपा सरकारने चर्चेपासून पळ काढला. केवळ भरपूर मदत दिली आहे, असे म्हणून चर्चा टाळणे हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.दरम्यान नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की,शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाजपा सरकार गंभीर असते तर विरोधी पक्षाच्या स्थगन प्रस्तावावार सभागृहता चर्चा केली असती पण हे सरकारच शेतकरी विरोधी असल्याने त्यांनी चर्चा करणे टाळले. हिवाळी अधिवेशनाच्या आज पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक झालेल्या



महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करून शेतकरीविरोधी तिघाडी सरकारचा निषेध केला. त्यांनतर विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले यांनी सरकारवर तोफ डागली.नाना पटोले म्हणाले की, देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात होत आहेत. विदर्भातील प्रश्नावर चर्चा करु म्हणणारे भाजपचे सरकारच विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चाच करत नाही. हे सरकार १४कोटी जनतेशी खोटे बोलत आहे. शेतकऱ्यांना मदत करायची आहे की नाही ते सरकारने स्पष्ट केले पाहिजे. हिवाळी अधिवेशनाचा कालावधीही कमी आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करत पर्यटनासाठी हे लोक आहेत. जनतेच्या प्रश्नावर सरकार गंभीर नाही.नाना पटोले म्हणाले की, विदर्भातील शेतकरीही अनेक समस्यांना तोंड देत आहे. अजून खरेदी केंद्रे सुरु झाली नाहीत. शेतकऱ्याचे धान व्यापारी ४००-५०० रुपये कमी दराने खरेदी करत आहेत. भाजप सरकार शेतकऱ्यांच्या धानाला भावच मिळू देत नाही. धानाला अजून बोनसही जाहीर केलेला नाही. सरकारने धानाला एक हजार रुपये बोनस दिला पाहिजे अशी मागणीही पटोले यांनी केली आहे.

## महाराष्ट्रातले महत्वपूर्ण प्रोजेक्ट गुजरातला देण्याची राज्य सरकारने सुपारी घेतली–पवार

**वर्धा**–सत्तेत असलेल्या लोकांबद्दल बोलायच झाले तर त्यांनी कुटुंब फोडण्याची आणि पक्ष फोडण्याची सुपारी घेतली आहे. तसेच महाराष्ट्रातले महत्वपूर्ण प्रोजेक्ट गुजरातला देण्यात यावे तिथल्या युवकांना न्याय मिळावा याची सुद्धा सुपारी सरकारच्या सर्व नेत्यांनी घेतली आहे. सामान्य लोक अडचणीत आहे पण फक्त पदाबाबत चर्चा करायची स्वतःच हीत जपण्याची सुपारी सुद्धा या सर्व नेत्यांनी घेतली आहे. असा टोला त्यांनी लगावला.दरम्यान रोहित पवार पुढे बोलताना म्हणाले की, सरकारला आमदारांना आणि सामान्य नागरिकांना सुद्धा गृहीत धरते अश्या आजच्या परिस्थितीत सामान्य नागरिक अडचणीत आहे तेव्हा चर्चेत काय आणलेय तर



कसीनोच बील चर्चेसाठी आणले आहे म्हणजे हे सरकार गोंधळेलले आहे आणि निकामी सरकार आहे असे आमचे मत आहे.युवकांचे प्रश्न मांडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार हे संघर्ष यात्रेच्या माध्यमातून रस्त्यावर उतरलेत. बुधवारी ही यात्रा वर्धा जिल्ह्यात दाखल झाली आहे. आज (गुरूवार, ७ डिसेंबर) रोहित पवार यांची युवा संघर्ष पदयात्रा ही वायफड येथून वर्धेकरीता रवाना झाली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी शिंदे-फडणवीस- पवार सरकारच्या कारभारावर सडकून टीका केली.आमदार रोहित पवार म्हणाले की, छगन भुजबळ हे सत्तेत आहे त्यांच्याकडे संविधानिक पद आहे. तुमच्याकडे संवेधानिक पद असेल तर त्याचा वापर कुठेतरी सामान्य लोकांसाठी केल पाहिजे. कॅबिनेटमध्ये तुम्ही बोलले पाहिजे. बाहेर जाऊन मीडिया समोर बोलणे, मोठी मोठी भाषण करने यापेक्षा संविधानिक पद सोडा तरी नाहीतर मग कॅबिनेट मध्ये चर्चा करा.

## मुख्यमंत्री प्रचारात व्यस्त; मंत्रीही बांधावर गेले नाहीत–विजय वडेट्टीवार


**नागपूर**–राज्यातील दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, 'मीचांग'मुळे शेतकरी उद्धवस्थ झाला आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ केले पाहिजे, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. शेतकरी संकटात असताना देखील मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर फिरकत नाहीत, मुख्यमंत्री प्रचारात व्यस्त असतात, अशा शब्दात वडेट्टीवार सत्ताधाऱ्यांचे वाभाडे काढले. विजय वडेट्टीवार यांनी विधानभेत आज स्थगन प्रस्ताव मांडला, त्यावेळी ते बोलत होते.विजय वडेट्टीवार म्हणाले की, विदर्भ मराठवाड्यातील शेतकरी संकटात होरपळला आहे. कापूस, धान, संत्रा, द्राक्ष, कांदा , सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. मंत्री बांधावर पाहणी करायला गेले नाहीत. मुख्यमंत्री प्रचारात व्यस्त होते. सरकारने या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या पण पंचनामे होत नाहीत. सरकारने दुष्काळ जाहीर करताना दिरंगाई केली होती. फक्त ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला. याच तालुक्यांना आर्थिक मदत मिळणार आहे. त्यानंतर आमच्या सरसकट दुष्काळाच्या मागणीनंतर सरकारने १ हजार २१ महसूल मंडळात दुष्काळ जाहीर केला. पण दुष्काळ सदृश्य परिस्थिती असा सरकार शब्दप्रयोग करतंय. या १ हजार २१ महसूल मंडळांना आर्थिक मदत मिळणार नाही. हे दुर्दैव आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे. त्यामुळे



शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सरसकट कर्जमाफी केली पाहिजे, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली आहे.शब्दांचा छळ करून ट्रीपल इंजिन सरकार शेतकऱ्यांना कसं मूर्ख बनवते बघा सरकारने दुष्काळ जाहीर करताना दिरंगाई केली होती. नंतर फक्त ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला. याच तालुक्यांना आता आर्थिक मदत मिळणार आहे. सर्व दुष्काळग्रस्त तालुक्यांना मदत देण्याची मागणी आम्ही केल्यानंतर सरकारने घोषणा तर केली पण दुष्काळ सदृश्य परिस्थिती असा शब्दप्रयोग करून महायुती सरकारने १ हजार २१ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना आर्थिक मदतीपासून वंचित ठेवले. असा आरोप विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

## बाळासाहेब असते तर शिवसेनेमध्ये फूटच पडली नसती:नीलम गोऱ्हे

**नागपूर**–बाळासाहेब ठाकरे असते तर शिवसेनेमध्ये फूटच पडली नसती. त्यांनी नाराजांना थांबविले असते. इतकेच नाही तर वेळप्रसंगी स्वत: कार काढून समजूत काढून परत आणले असते. असे मत विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले आहे. बाळासाहेबांनी नेमके काय केले असते हे निश्चित सांगता येत नसल्याचेही त्या म्हणाल्या. त्यांच्या या वक्तव्यावर उद्धव ठाकरे गटाने नेते विनायक राऊत यांनी टीका केली आहे. नीलम गोऱ्हे यांनी २४ वर्ष उद्धव ठाकरेंच्या मेहरबानीने पद उपभोगली असल्याचे विनायक राऊत यांनी म्हटले आहे. राजकीय इच्छाशक्ती असेल तर मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविणे शक्य असल्याचे मतही नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले आहे. निवडणुकांतील महिला आरक्षण विधेयकाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तसे करून दाखविले असल्याचे त्या म्हणाल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार



यांच्याकडे तशी इच्छाशक्ती असल्याचेही त्यांनी सांगितले.नीलम गोऱ्हे यांनी आज बाळासाहेब असते तर या विषयांवर आपली भूमिका मांडली. वास्तविक त्यांनी काय केले असते, याचा अंदाज लावता येणार नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्या महाराष्ट्र टाईम्ससोबत बोलत होत्या. या वेळी त्या म्हणाल्या की, २०१४ पासून प्रत्येक निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांच्या भूमिका बदलत राहिल्या आहेत. सध्या राज्यात जे काही चालले आहे ते पचविणे अवघड आहे. त्यामुळे, मी सध्या फार दूरचा विचार करत नाही. पुढील केवळ तीन महिन्यांचा काळ माझ्या डोळ्यांसमोर ठेवला आहे, असेही त्या म्हणाल्या.नीलम गोऱ्हे यांचे वक्तव्य म्हणजे विकृती असल्याचे म्हणत उद्धव ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांच्यामुळेच त्यांच्या शिवसेनेतील २५ वर्षांच्या कारकिर्दीमधील साडेचोवीस वर्ष त्यांनी विविध पदे उपभोगली असल्याचे विनायक राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे अशा प्रकारची असणे हे दुर्दैव असल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार असंवेदनशील:सरकार ज्या पद्धतीने वागत आहे ते अत्यंत चुकीचे–बाळासाहेब थोरात

**नागपूर**–शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, याचा प्रत्यय आज सभागृहात आला. अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे महाराष्ट्रात शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या प्रश्नांवर चर्चा करावी अशी मागणी विरोधकांनी स्थगन प्रस्तावाद्वारे केली. मात्र सरकारने चर्चा तर सोडा साधे निवेदन सुद्धा केले नाही. असा घनाघाती आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी केला आहे.नागपूर येथील अधिवेशनाचा पहिलाच दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून गाजला. पायर्यांवर आंदोलन केल्यानंतर सभागृहात विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची मागणी सरकारकडे लावून धरली. मात्र अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज सुरू ठेवत विरोधकांची चर्चा करण्याची मागणी फेटाळली. त्यामुळे संतापलेल्या आमदार बाळासाहेब थोरात यांनी सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत गंभीर नसल्याचा आरोप केला.बाळासाहेब थोरात म्हणाले की, नुकताच झालेला अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे १६ जिल्ह्यातील ९१ तालुक्यांमधील १ लाख हेक्टर पेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले आहे. बुलढाणा, नाशिक आणि नगर जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची तीव्रता प्रचंड आहे. द्राक्ष आणि कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कोकणात आंबा पिकालाही या अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. सरकार मात्र या सर्व बाबींवर चर्चा करायला तयार नाही. आज पंचनामे आणि मदतीची स्थिती अत्यंत गंभीर आहे. अवकाळी पावसाला इतके दिवस उलटून गेले तरी अनेक भागात शेतकऱ्यांच्या शेतावर अद्याप पर्यंत प्रशासन पोहोचले नाही, पंचनामे पूर्ण झाले नाही.बाळासाहेब थोरात म्हणाले की, एकाच वर्षात शेतकरी अवकाळी व दुष्काळी अशा दुहेरी संकटांचा सामना करतो आहे. दुष्काळाशी झुंजणाऱ्या शेतकऱ्याला अजूनही दिलासा मिळाला नाही. त्यातच अवकाळी पावसाचे संकट येऊन उभे ठाकले आहे. सरकारने नुसती मदत जाहीर करण्याची मलमपट्टी करण्यापेक्षा या शेतकऱ्यांसाठी ठोस उपाय योजना कराव्यात. शेतकऱ्यांना धीर द्यावा यासाठी सभागृहात चर्चेची मागणी आम्ही केली होती मात्र सरकारने सभागृहाचे कामकाज रेटत विरोधकांचा आवाज दाबला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी या सभागृहाचे कामकाज बघतो आहे. शेतकऱ्यांना या अधिवेशनाकडून मोठ्या आशा आहेत. या अधिवेशनात सरकार आपले म्हणणे ऐकेल आणि आपल्याला मदत करील अशी अपेक्षा शेतकरी बांधवाला आहे. मात्र सरकार ज्या पद्धतीने वागत आहे ते अत्यंत चुकीचे व निषेधार्ह आहे, असेही थोरात म्हणाले



# मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आपणास मराठी बांधवांच्या वतीने विनंती, २४ डिसेंबर पर्यंत आरक्षण द्या - मनोज जरांगे पाटील

## सरकारविरुद्ध मराठा असा संघर्ष होऊ देऊ नका –मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील



**हिंगोली** –हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस पाटी येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षणावर मराठा समाजाची विराट महासभा दिनांक ७/१२/२०२३ रोजी दुपारी चार वाजता संपन्न झाली .हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस पाटी येथे जाहीर सभेचे मराठी बांधवांच्या वतीने नियोजन करण्यात आले होते. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आणि मराठा समाज बांधवांची वज्रमुठ अशीच कायम राहण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी हिंगोली जिल्ह्यातील लाखो मराठा समाज महिला भगिनी मातांचा अति विराट रूप प्रत्यक्षात यानिमित्ताने दिसले. या विराट मराठा बांधवांच्या व मातांच्या सभेला संबोधित करतांना मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील भाऊक होऊन सभेला संबोधित करतांना म्हणाले, मायबाप मराठा बांधव, महिला, भगिनींनो, मतांनो, माझं शरीर उपोषण केल्यामुळे साथ देत नाही. तरी मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी आणि आपल्या लेकरांचं उज्वल भविष्य घडविण्यासाठी मी सतत लढत राहणार आहे. यासाठी मला तुमची सर्वांच्या एकजुटीची गरज असुन सर्व समाजाची कायम साथ हवी आहे. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, ओबीसी मध्ये सामावून घेतले जात नाही. तोपर्यंत एक इंचही मागे हटणार नाही . मी आपणाला अशी शपथ देतो की मराठा समाजासोबत कधीच विश्वासघात करणार नाही. अशी भावनिक हाक मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा जनसमुदायाला दिली. पुढे मनोज जरांगे पाटील म्हणाले गावं पातळीवर ओबीसी बांधवांनी मराठा एक दिलाने सोबत आहोत काही नेते मात्र भांडण लावण्याचे काम करत आहेत. मायबाप मराठ्यांनो आपल्या लेकरांसाठी एक दिलाने काम करत राहा नेत्यांच्या भूलथापांना बळी पडू नका आरक्षणाचा लढा अंतिम टप्प्यावर आलेला आहे. त्यामुळे मराठा समाजाला ओबीसी आरक्षपासुन कोणीही रोखू शकत नाही. आरक्षण मिळाल्याशिवाय मराठा समाज थांबणार नाही. ओबीसी समाजामध्ये आणि मराठ्यांमध्ये काही विदुषक नेते मंडळी भांडण लावण्याच काम करत आहेत. आपण एकच आहोत यांच्या भुलथापांना बळी पडू नका माझ्या गोरगरीब मराठ्यांच्या लेकरांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी हा लढा आहे. त्यामुळे थंड डोक्याने शांत राहून उपोषण आंदोलन करा आपण सर्व एक दिलाने लढु आणि विजय नक्कीच प्राप्त करू खचून जाऊ नका ही लढाई अंतिम टप्प्याच्या वळनावर आलेली आहे आणि आपण ही लढाई जिंकणारच.असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला दिला.ते पुढे म्हणाले की,माझ्या भावांनो आत्महत्या करू नका ही लढाई तुमच्यासाठीच आहे. आई-वडिलांना पोरक करू नका, अशी भावनिक साद मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठी समाज बांधवांना घातली आहे .मराठ्यांना आरक्षण हे सरकारला द्यावच लागेल त्यामुळे सरकारनची २४ डिसेंबर पर्यंत वाट पाहा सरकार कसं देत नाही त्यांच्या छाताडावर बसून घेऊ काळजी करू नका, मी आपल्या सर्वांच्या साक्षीने सर्वांच्या समोर सरकारला विनंती करतो. मराठा समाज ओबीसी मध्ये सामावून सरसकट प्रमाणपत्र देऊन कायदा पारित करा. सरकार विरुद्ध मराठा समाज असा संघर्ष कृपा करून होऊ देऊ नका, सरकार मधलाच मंत्री भुजबळ जाती-जातीमध्ये भांडण लावण्याचे काम करत आहे. दंगली घडविण्याचं काम करत आहे. सरकारने त्यांना आवर घालावा अन्यथा याची जबाबदारी सरकार म्हणुन आपली असेल असा इशारा मनोज जरांगे यांनी या सभेतून थेट सरकारला दिला.मराठा बांधवांनो माय बाप लेकरांनो दंगल घडू देऊ नका कायदा सुव्यवस्था बिघडवू देऊ नका. आरक्षण मिळेपर्यंत शांत राहून आंदोलन करा असे आव्हान मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केले आहे.सरकारला ठणकावून सांगितले की, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी मधून कुणबी प्रमाणपत्र मिळतीलच परंतु आरक्षणाचा जीआर काढतांना त्या जीआर मध्येच कुणबी प्रमाणपत्रांच्या व्हॅलिडीटीसाठी प्रक्रिया किचकट ठेवू नये किंवा जीआर मध्येच उपलब्ध पुराव्याच्या आधारे शैक्षणिक व नोकरीमध्ये कुणबी आरक्षण द्यावे. फक्त आरक्षणाचे ताट समोर पण त्याचा उपयोग झाला पाहिजे .महत्त्वाचे म्हणजे फक्त कुणबी प्रमाणपत्र मिळाले म्हणजे आपली लढाई संपली नाही. परंतु हे सर्टिफिकेट व्हॅलिड होणे महत्त्वाचे आहे, त्यामुळे सावध राहा गाफील राहू नका असे आव्हान मराठा जनसमुदायाला मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले. या सभेच्या ठिकाणी रांगोळीच्या साह्याने जरांगे पाटील यांची प्रतिमा साकारण्यात आली होती. या सभेसाठी हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक गावामधील स्वयं सेवकांनी अतिशय चोख नियोजन करून शांततेचा आदर्श घालून दिला. या सभेच्या ठिकाणी अन्नदान करणारे गावकरी मंडळींच्या वतीने स्टॉल उभारण्यात आले होते(१)आसोंदा स्टॉल (२)लाख स्टॉल (३)लाख स्टॉल (४)पेहणीस्टॉल (५)सवडस्टॉल (६)पोटा बु स्टॉल (७)पेडगाव सर्कल स्टॉल (८)सुरवाडी स्टॉल(९)काकडदाभा.स्टॉल (१०)येहळेगाव सोळंके स्टॉल(११)बळसोंडस्टॉल (१२) निशाना स्टॉल (१३)मेथास्टॉल क्र (१४)नांदुरा स्टॉल (१५)इंचा स्टॉल (१६)पांगरीस्टॉल (१७)आमला स्टॉल क्र (१८)व स ई स्टॉल क्र (१९)शिवनी स्टॉल क्र (२०)खंडाळा स्टॉल (२१)फुलदाभा स्टॉल क्र (२२)जामठी स्टॉल क्र (२३)लाख स्टॉल क्र (२४)हानवत खेडा स्वयंसेवक नियंत्रक समितीचे सदस्य १) मनिष भाऊ आखरे: २)डॉ. नारायण जाधव : ३)सतीश महागावकर : ४)बाबाराव कोटकर ५)राजेश टाले : ६) शिवशंकर कऱ्हाळे : ७) आर. टी. शिंदे : ८) अविनाश चव्हाण*पार्कीक जवाबदारी* अ)औंढा रोड १)राजु पाटील धारखेडा: २)बाबुराव सावळे: ३)जगन शिंदे: ४)भुजंग सोळंके: ब)हिंगोली ,केसापुर रोड१)अनिल शेळके २)शंकर कऱ्हाळे :३)मंगेश वाबळे हिंगोली,प्रल्हाद कऱ्हाळे : हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक गावांमधील स्वयंसेवकांनी या सभेसाठी अहोरात्र परिश्रम करून नियोजन करून सभा यशस्वी केले या सभेसाठी जिल्ह्यातील पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता सर्व जिल्ह्यातील मराठी समाज बांधवांनी या विराट सभेचा दर्शन घडून आणलय

# फडणवीसांच्या पत्राचे काय करायचे ते मी करेल-पवार

## कुणी कुठे बसावे, हा विधानसभा अध्यक्षांचा अधिकार

**नागपूर**–देवेंद्र फडणवीस यांनी पाठवलेले पत्र मला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसने सरकारमध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता. त्या नंतर नवाब मलिक पहिल्यांदाच सभागृहात आले आहेत. त्यांनी अद्याप कोणतीच भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे त्यांची भूमिका स्पष्ट झाली त्या नंतर मी त्याबद्दल बोलणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. मलिकांनी स्वतःचे मत अद्याप व्यक्त केलेले नाही. मलिकांनी त्यांची भूमिका सांगितल्यानंतर मी बोलणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.कुणी कुठे बसावे हा माझा अधिकार नाही. हा विधानसभा अध्यक्षांचा अधिकार आहे. त्यांचे ते बघतील, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे. कोण कुठं बसलं हे टीव्हीवाल्यांनी दाखवून दिलं असेही ते म्हणाले. फडणवीसांच्या पत्राचे काय करायचे ते मी करेल, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे. नवाब मलिक प्रकरणावरुन देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना पत्र पाठवले होते. या पत्रावर माध्यमांनी अजित



पवार यांना प्रश्न विचारले असता त्यांनी हे उत्तर दिले आहे. या वेळी काही माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार यांनी संताप व्यक्त केल्याचेही दिसून आले.त्या पत्राचं काय करायचे ते मी करीन, मी तुम्हाला सांगून करणार नाही, अशी प्रतिक्रिया देखील अजित पवार यांनी दिली आहे. प्रत्येकाला भूमिका घेण्याचा अधिकार आहे. नवाब मलिक यांच्याशी बोलून त्यांची भूमिका काय आहे, हे पाहिल्यानंतरच मी माझा निर्णय आणि पक्षाची भूमिका जाहीर करणार असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे पत्र मला मिळाले, आणि ते पत्र मी वाचले असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.नवाब मलिक हे शरद पवार गटासोबत जाणार की, अजित पवार गटासोबत जाणार हे त्यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही. विधानभवन परिसरात आल्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात गेले होते. मात्र, विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेसचे एकच पक्ष कार्यालय आहे. त्या नंतर ते सत्ताधारी बाकावर सर्वात मागे बसल्याने त्यांचा अजित पवार गटाला पाठिंबा असल्याचा अंदाज लावण्यात आला आहे. या संदर्भात नवाब मलिक यांनी मात्र, अद्याप कोणतीच स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नाही.

# हे सर्व ढोंग आणि सोंग:खा.संजय राऊत

**मुंबई**–सत्तेपेक्षा देश महत्त्वाचा हे, पहिल्यांदाच सांगितले का? असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. नवाब मलिकांवर तुम्ही टीका करता आणि त्याच प्रकारची केस प्रफुल पटेल यांच्यावरही आहे. या प्रकरणात तर भाजपने सोनिया गांधींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तर पटेलांवर तुमचे मत काय? असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीसांना विचारला आहे. हे सर्व ढोंग आणि सोंग असल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे.नागपुरातील सभागृहात एकमेकांच्या बाजूला बसतात आणि एकमेकांना पत्र लिहितात, हे सर्व ढोंग आहे. हिंमत असेल तर उभे राहुन नवाब मलिक किंवा अजित पवार यांनाच सांगा ना? जे आरोप मलिकांवर आहेत, तेच आरोप पटेल यांच्यावरही असल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. सर्च भ्रष्ट लोक तुम्ही तुमच्या सोबत घेतले आहेत. आणि नवाब मलिक यांच्यावरच आरोप का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुमच्यासोबत बसलेल्यांना तुम्ही आधी जेलमध्ये टाकणार होता. आता तेच तुमच्या बाजूला बसले असल्याचे संजय



राऊत यांनी म्हटले आहे.तानाजी सावंत हे अत्यंत खोटारडे मंत्री आहेत. ज्या प्रश्नांची उत्तरे आम्ही विचारले त्यावर ते बोललेले नाहीत. त्यांचे सर्व पुरावे आमच्याकडे आहेत. ते पुरावे आम्ही मुख्यमंत्र्यांना पाठवले आहे. त्यावर काय कारवाई होतो, याकडे आम्ही लक्ष ठेवलेले आहे. आरोग्य खात्यात काय सुरु आहे, हे सर्वांना माहिती आहे. ५० कोटींचे टेंडर ५०० कोटींत दिले जात आहे. ही क्रिस्टल कंपनी कोणाची आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आरोग्य खात्यातील भ्रष्टाचारचे पैसे आरोग्य मंत्र्यांकडे जात असल्याचेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.

# दुध रस्त्यावर सांडून निषेध

## अवयव विक्रीसाठी काढलेल्या शेतकऱ्यांचे आंदोलन;पिकविमा,भरपाई, कर्जमाफीचीही मागणी



**हिंगोली**–हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिकविमा द्यावा तसेच अवकाळी पावसामुळे झालेली नुकसान भरपाई द्यावी व कर्जमाफी द्यावी या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत शेतकऱ्यांनी गोरेगावच्या अप्पर तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी शुक्रवारी सकाळी आठ वाजता ४० लिटर दुध रस्त्यावर सांडून सरकारचा निषेध केला.सेनगाव तालुक्यातील गोरेगाव येथील शेतकऱ्यांनी पिककर्ज फेडण्यासाठी पैसे नसल्याने अवयव विक्रीसाठी काढले होते. या शेतकऱ्यांनी थेट मुंबईत जाऊन अवयव विक्रीचे दुकान मांडले. मात्र त्याठिकाणी आझाद मैदान पोलिस चौकीच्या पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर या शेतकऱ्यांनी माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारवर कडाडून टिका केली. कर्जमाफी तसेच पिकविम्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचे आदेश त्यांनी शिवसेनेच्या (उबाठा) पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.दरम्यान, मुंबई येथून परतलेल्या शेतकऱ्यांनी शासनाच्या निर्णयाची वाट पाहिली. मात्र शासनाकडून या आंदोलनाची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आंदोलन आणखी तिव्र करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज गोरेगाव येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करून ४० लिटर दुध रस्त्यावर सांडून सरकारचा निषेध केला.यावेळी नामदेव पतंगे, गजानन कावरखे, रामभाऊ कावरखे, रामेश्वर कावरखे, मदन कावरखे, संतोष वैद्य, सखाराम भाकरे, बबन खिल्लारी, विश्वनाथ खोडके, मनोहर घुपसे, प्रमोद कावरखे, शिवाजी कावरखे, नारायण रवणे, बाळू जाधव, शोभाबाई लांभाडे, राधाबाई लांभाडे आदी शेतकरी उपस्थित होते.

# नवाब मलिक यांना अडचणीत टाकणार नाही–प्रफुल्ल पटेल

**नागपूर**–माझ्याबद्दल जे द्यायचे ते उत्तर शरद पवार यांनी आधीच दिले असे प्रत्युत्तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनी विधानपरिषदेचे विरोधीपक्षनेते अंबादास दानवे यांना दिले आहे. तसेच निवडणुकीतील पराभवानंतर विरोधक निराश झालेले आहेत त्यामुळे आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे असा हल्लाही प्रफुल पटेल यांनी केला आहे.विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते दानवे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी नवाब मलिकांबद्दल घेतेल्या भूमिकेबद्दल फडणवीसांचे कौतूक केले आहे. त्याच बरोबरच तसाच आरोप प्रफुल्ल पटेल यांच्यावरही झाला असल्याची आठवण फडणवीसांना करुन दिली आहे. यावर बोलताना पटेल म्हणाले, माझ्याबद्दल जे द्यायचे ते उत्तर शरद पवार यांनी आधीच दिले असे म्हंटले आहे. त्यामुळे एकंदरीत या प्रकरणावरुन पत्रा पत्री सुरु असल्याचे दिसून येत आहे.नवाब मलिक हे आमचे जुने सहकारी आहेत. त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची राजकीय चर्चा केली नसून त्यांना कोणत्याही राजकीय घडामोडीत देखील सहभागी करून घेतले नसल्याचे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी म्हंटले आहे. तसेच कर्तव्य म्हणून त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी त्यांची भेट घेतली असे पटेल यांनी स्पष्ट केले आहे.पुढे याबाबत बोलताना पटेल म्हणाले, जे काही घडले ते सर्वांना माहित आहे. त्या दरम्यान राष्ट्रवादी पक्षात देखील अंतर्गत घडामोडी झाल्या. त्यावेळी मलिक कोणासोबत नव्हते त्यांचा संबंध आलाच नाही. जामीन झाल्यांनतर त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आम्ही गेलो. सहकाऱ्यांच्या तब्येतीची विचारपूस करणे हे आमचे कर्तव्य आहे असे पटेल म्हणाले.तर नवाब मलिक हे आमदार आहेत, जनप्रतिनिधी आहेत. जुने सहकारी एकमेकांना भेटतात, बोलतात. आम्ही कुठेही मालिकांच्या भूमिकेविषयी चर्चा केली नाही. ते मेडिकल बेलवर असल्याने आम्हाला त्यांच्याशी चर्चा करायची नाही. कोण कुठे बसणार हे महत्वाचे नाही. त्यांच्याकडे अधिकार आहेत म्हणून ते आले.मेडिकल बेलवर असलेल्या व्यक्तीसोबत राजकीय चर्चा केली जात नाही. आम्ही त्यांची सदिच्छा भेट घेतली होती. पक्षात मालिकांची भूमिकेबाबत आम्ही बोलणार नाही. केवळ त्यांची प्रकृती बरी व्हावी त्यांना आम्ही राजकीय चर्चा करून अडचणीत टाकणार नाही असेही पटेल यांनी स्पष्ट केले आहे. तसेच निवडणूक आयोगाकडे त्यांच्याबाबत कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत असेही पटेल म्हणाले.

# कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर आलाय:पिक विम्याचा एक रुपया देताना सरकारला लाज वाटायला हवी? वडेट्टीवार

**नागपूर**–राज्यातील दुष्काळाने ६ लाख ३५ हजार हेक्टर बाधित झाले आहे. शेतकऱ्यात नैराश्य आहे. अजून पंचनामे झाले नाहीत. अधिकारी सरकारचे का ऐकत नाहीत, असा सवाल करत विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरले. राज्यात अवकाळीने पीक गमावले.आता नाशिक परिसरात कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे. तरी देखील चर्चा करू, असे सरकार मोघम उत्तर देत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर नाही, अशी टिका विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली.विजय वडेट्टीवार म्हणाले, सरकारने एक रुपयाचा विमा उतरवला. फायदा कोणाचा झाला? पीकविमा कंपन्यांना कोट्यवधींचा फायदा होणार. सरकारला लाज वाटली पाहिजे, अशा शब्दात सरकारवर हल्लाबोल केला. काही शेतकऱ्यांनी आपले अवयव विकायला परवानगी मागितली तरी सरकारला जाग नाही. शेतकऱ्यांना एक रुपया देणाऱ्या सरकारला लाज वाचायला हवी होती, अशी टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.राज्यातील शेतकरी पीक कर्ज परत करू शकत नाही. कांद्यावरील निर्यात बंदी उठवली नाही. नाशिक पट्ट्यात पाऊस झाला द्राक्ष पीक वाया गेले. तिथे देखील शेतकऱ्यांना मदत नाही. नाशिक महामार्ग शेतकऱ्यांनी रस्ता रोको सुरू केला आहे. शेतकरी रस्त्यावर बसला आहे. शेतकरी कसा जगणार. व्यापाऱ्यांनी हात वर केले आहेत. हे लक्षात घेता यावर चर्चा करावी लागेल,अशी मागणी श्री. वेडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे विधानसभेत केली. पंतु चर्चेची मागणी फेटाळल्याने विरोधी पक्षाने सभात्याग केला.

# विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा – राज्यपाल रमेश बैस

**नागपूर । प्रतिनिधी**


केंद्र शासनाने सर्वसामान्य घटकांच्या कल्याणासाठी योजना सुरु केल्या आहेत. त्या लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'विकसित भारत संकल्प यात्रा' हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा, असे आवाहन आज राज्यपाल रमेश बैस यांनी भंडारा जिल्ह्यातील शहापूर येथील डिफेन्स अकॅडमी येथे आयोजित कार्यक्रमात केले.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावीत, खासदार सुनील मेंढे, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार परिणय फुके, विशेष पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलीस अधीक्षक लोहीत मतानी उपस्थित होते.राज्यपाल आणि पालकमंत्री यांच्या हस्ते विकसित भारत संकल्प यात्रेच्या प्रचार वाहनाला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला.केंद्र व राज्य



शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विकसीत भारत संकल्प यात्रा महत्वाची ठरणार असून, याद्वारे चिन्हीत करण्यात आलेल्या १७ योजनांचा प्रचार-प्रसार करून त्या तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. या यात्रेच्या माध्यमातून आयुष्मान भारत, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, पंतप्रधान विश्वकर्मा, पंतप्रधान किसान सन्मान, किसान क्रेडिट कार्ड, प्रधानमंत्री पोषण अभियान, हर घर जल-जल जीवन मिशन, जनधन योजना, अटल पेन्शन योजना, नॅनो फर्टिलायझर्स इत्यादी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावी लागेल. यासाठी लोकसहभागही महत्वाचा असल्याचे राज्यपालांनी अधोरेखित केले.विकसित भारत यात्रेचा मूळ उद्देश शासनाच्या योजनांच्या प्रसारासोबतच लाभार्थ्यांना वेळेत लाभ देणे आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील १११ गावात ही यात्रा पोहोचली असून, ७ हजारांवर नागरिकांनी सहभाग घेतला असल्याचे पालकमंत्री डॉ.गावीत यांनी सांगितले.पंतप्रधानांच्या नेतृत्वात विकसित भारत संकल्प यात्रेतून देश विकासमार्गावर अग्रेसर होणार असल्याचा विश्वास खासदार श्री. मेंढे यांनी व्यक्त केला. यासोबतच केंद्र शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत जिल्ह्यात सुरु असलेल्या प्रगतीविषयी माहिती त्यांनी दिली. भोंडेकर यांनी जिल्ह्यातील विकासकामांची माहिती दिली.राज्यपालांच्या हस्ते विविध योजनांचे २२ लाभार्थ्यांना लाभ वितरीत करण्यात आले. तुमसर येथील पवन कटनकर व लाखनी उमेद महिला बचतगटाच्या उषा कावळे या लाभार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राज्यपालांनी विकसित भारत संकल्प उपक्रमांतर्गत सहभागी शासकीय विभागांच्या स्टॉल्सना भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला.कुर्तकोटी यांनी आभार मानले. या कार्यक्रमानंतर राज्यपालांनी कोरंबी येथील पिंगळेश्वरी मातेच्या मंदिरात भेट देऊन दर्शन घेतले.

# मजरा (खु.) येथे महामानवाला अभिवादन



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मजरा लहान येथे पंचशील बौद्ध मंडळ कमिटी च्या वतीने भारतरत्न, महामानव,बोधिसत्व डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचा ६७ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.यावेळी संपूर्ण गावातून भिमज्योत काढून महामानवाला अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन भिमज्योतीला सुरुवात करत 'बाबासाहेब अमर रहे ' च्या घोषणा देत संपूर्ण गावातून भिमज्योत काढण्यात येऊन आदरांजली वाहण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत सदस्या प्रतिभा मानकर, बौद्ध पंच कमिटी अध्यक्ष रागिणी मानकर, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार ग्यानीवंत गेडाम,आबा रामटेके, मारोती कवाडे, पाटील, खोब्रागडे, सिद्धार्थ वानखेडे, कैलास गेडाम,विद्या सोनटक्के,भरणे, सुप्रिया खोब्रागडे,रमा गेडाम, उज्वला गेडाम, जिजाबाई वावरे,सागर उमरे, गडेकर, ज्योती सुखदेवे, सुभाष सुखदेवे, प्रांजली सुखदेवे व गावातील सर्व बौद्ध उपासक तथा बौद्ध उपासिका व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर टाकला.

# चलो नागपूर प्रचार सभा संपन्न

**पुलगाव । प्रतिनिधी**

दि.८डिसेंबर२०२३ शुक्रवार ला सकाळी १० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृह अयोध्या नगर नाचणगाव तालुका देवळी जिल्हा वर्धा येथे दि.११ डिसेंबर २०२३ सोमवार च्या नागपूर मोर्चा मध्ये सर्वाधिक संख्येने धनगर समाज बंधू भगिनींच्या सहभागा बाबत प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचाव शिवदास बिडगर धनगर नेते परळी वैजनाथ जिल्हा बीड, सागर मुलगुडे सांगली,सुधाकर गोरडे अध्यक्ष धनगर समाज संघ नाचणगाव-पुलगाव, उपाध्यक्ष रामदास साव उपस्थित होते. प्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पुष्पहार घालून पूजन केले.प्रमुख अतिथी शिवदास बिडगर यांचा धनगर समाज संघ नाचनगाव-पुलगाव जिल्हा वर्धा च्या वतीने शाल ,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून सर्व मान्यवर अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सुधाकर गोरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृहाला कंपाउंड वॉल, लोखंडी गेट, सिमेंट रोड आणि कमान याकरिता माननीय आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कडून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन धनगर समाज संघ नाचणगाव पुलगाव च्या वतीने शिवदास बिडकर यांना देण्यात आले. शिवदास बिडगर यांनी धनगर एस टी आरक्षण अमलबजावणी



बाबत आयोजित महामोर्चात नागपूर येथे संपूर्ण महाराष्ट्रातून लाखोच्या संख्येने समाज बांधवांनी आवर्जून त्या ठिकाणी अधिकाधिक संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करून, आरक्षणाचे महत्त्व सांगून, याकरिता आमदार गोपीचंद पडळकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रात धनगर जागर यात्रे च्या यशस्वी आयोजनातून या महामोर्चात अधिकाधिक समाज बांधवांनी उपस्थित राहण्याकरिता समाज बांधवांना आव्हान केले.दि.६व८ डिसेंबर २०२३ ला वर्धा जिल्ह्याच्या प्रचार दौऱ्याकरिता शिवदास बिडकर पुलगाव चे सभेला संबोधित करून पुढील प्रचार सभे करिता निघाले .याप्रसंगी दिलीप भुजाडे,हनुमंत जुवारे,डॉ.रायपुरे, भास्कर वैद्य,दीपक कावळे, सुनील उपासे,वाडकर ,रामदास साव, प्रकाश साव, दिवाकर महाजन, मधुकर कावळे ,प्रवीण महाजन, दीपक वाघ, ज्ञानेश्वर गोरडे, प्रकाश ढोमणे व नाचणगाव,पुलगाव परिसरातील असंख्य समाज बांधव उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन जुवारे यांनी केले आणि आभार प्रदर्शन वाडकर यांनी केले.शेवटी चहापान वितरण करून कार्यक्रमाची यशस्वी सांगता संपन्न झाली.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई व बोनस जाहीर करा-खा.प्रफुल पटेल

**नागपूर । प्रतिनिधी**

८ डिसेंबर रोजी नागपूर येथे महाराष्ट्र शासनाच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला देण्यात यावा व शेतकऱ्यांना डीबीटी च्या माध्यमातून २५ हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करण्याबाबदचे निवेदन देऊन खा. प्रफुल पटेल यांनी ना. देवेंद्र फडणविस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. मागील काही दिवसापासून अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांचे धानपिक, धानाच्या कडपा तसेच शेतात असलेले पुजन्यांना अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. तसेच शेतात असलेल्या कडधान्याच्या पीकाचे नुकसान झाले असून झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण आणि



पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानीचा मोबदला देण्यात यावा. तसेच मागच्या वर्षीच्या तुलनेत शेतकऱ्यांचा यावर्षी लागणारा मशागतीचा वाढीव खर्च लक्षात घेता डीबीटी च्या माध्यमातून बोनस स्वरूपात २५ हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करण्यात यावी यासंबंधी खा. प्रफुल पटेल यांनी ना. देवेंद्र फडणविस , उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन. यांना निवेदन दिले. यावेळी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, आमदार राजू कारेमोरे, आमदार विजय रहांगडाले, आमदार विनोद अग्रवाल, माजी आमदार राजेंद्र जैन, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, सुनील फुंडे, अध्यक्ष, बिडीसीसी उपस्थित होते.

# चिटफंड सुधारणा विधेयक विधानसभेत मंजूर; राज्य शासनाचे अपिलाचे अधिकार प्रशासकीय स्तरावर प्रदान

## अपिलाचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यास दिल्याने विलंब टाळला जाऊन अपिलकर्त्यांचा वेळ वाचणार – उपमुख्यमंत्री अजित पवार

**नागपूर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मांडलेल्या सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९- चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ मंजूर करण्यात आले. राज्य शासनाकडील अपिलाचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यास प्रदान केल्यामुळे अपील निकाली काढण्यातील विलंब टाळला जाणार आहे. त्यामुळे अपिलकर्त्यांचा वेळ देखील वाचणार आहे.विधेयक मांडताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, चिटफंड अधिनियम, १९८२ च्या माध्यमातून शासनामार्फत सर्व चिटफंडांचे नियमन केले जाते. या अधिनियमात दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे. सध्या वित्त मंत्र्यांकडे अपिलाचे अधिकार आहेत. वित्तमंत्र्यांकडील कामाच्या व्यापामुळे त्यांना अपिलांचे कामकाज चालविण्यासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. या पार्श्वभूमीवर प्रक्रिया गतिमान होण्यासाठी अपिलाचे अधिकार राज्य कर उपायुक्त दर्जाचा अधिकारी असलेल्या सहनिबंधक या अधिकाऱ्यांकडे देण्यात येत आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, चिटफंड चालवताना काही वेळा वाद निर्माण होतात. त्यावेळी चिटफंड चालवणाऱ्या कंपन्या कलम ६९ नुसार राज्य कर विभागातील चिटस् सहनिबंधकांकडे दाद मागतात. चिटस् सहनिबंधकांच्या निर्णयाने जर समाधान झाले नाही तर कलम ७० नुसार त्यांच्या निर्णयाविरुद्ध दोन महिन्यांच्या मुदतीत वित्त मंत्र्यांकडे अपील करण्याची तरतूद आहे. या सुधारणेमुळे हे अधिकार खालच्या स्तरावर म्हणजेच सहनिबंधकांकडे राहणार असून त्यामुळे अपील निकाली काढण्याची प्रक्रिया वेगाने पार पडण्यास मदत होणार आहे.

# मूल येथे संत संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी





**मूल । प्रतिनिधी**

विदर्भ तेली समाज महासंघ मूल द्वारा तेली समाजाचे आराध्य दैवत संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ वी जयंतीचे औचित्य साधून ८ डिसेंबर रोजी भव्य पालखी शोभायात्रा मूल नगरीत काढण्यात आली. सकाळी ११ वाजता तेली मोहल्ला ते मा.सा.कन्नमवार सभागृह चंद्रपूर रोड अशी भव्य पालखी शोभायात्रा ढोल, लेझीम,भजनमंडळी, देखावा सादर करीत शांततेत पार पडली त्यानंतर शिरोमणी संत श्री जगनाडे महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण मान्यवरांचे मार्गदर्शन,सामाजिक,शैक्षणिक, उद्योगशील क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या तेली समाज बंधू भगीनीचे सत्कार,समाज प्रबोधन, इयत्ता १० वी,१२ वी,पदवी,पदव्युतर विभागात सत्र २०२३ मधील गुणवंत विदयार्थी, नूत्य अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करून गुणगैरव करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरणास्थान बबनराव फ़ंड चंद्रपूर,रघुनाथ शेंडे सिंदेवाही, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सूर्यकांत खनके अध्यक्ष वि.ते.स.महा.चंद्रपूर, कार्यक्रमाचे उपाध्यक्ष देवराव भांडेकर माजी आमदार विधानसभा,प्रमुखअतिथी धनराज मुंगले जिल्हा उपाध्यक्ष वि.ते.स.महा चंद्रपूर, डॉ.प्रभूदास चिलबुले जिल्हा उपाध्यक्ष वि.ते.स. महा.चंद्रपूर, डॉ. प्रफुल आंबटकर अस्थीरोगतज्ञ् चंद्रपूर, घनशाम येनूरकर, शांताराम कामडे, चंदकांत आष्टनकर,डॉ.दांडेकर, कुनघाटकर , चेतना येनूरकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माया मुक्तेश्वर खोब्रागडे, प्रास्ताविक कैलास चलाख तर आभार प्रदर्शन चंदन बिनवले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अतुल सातपैसे,प्रशांत भरतकर, प्रवीण येनूरकर, राजू आगडे, चेतन कामडे, संजय कामडे, विजय नागोशे, लोकेश आगडे यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाला तालुक्यातील समस्त तेली समाज बंधू-भगिनी उपस्थिती दर्शविली.

# शंकरपूर येथे संत जगनाडे महाराज पुण्यतिथी




**शंकरपूर:-** दिनांक ०८ डिसेंबर रोज शुक्रवारला सकाळी १० वाजता संताजी जगनाडे महाराज देवस्थान शंकरपूर येथे संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ वी जयंती साजरी करण्यात आली त्या प्रसंगी उपस्थित संताजी जगनाडे महाराज देवस्थान चे अध्यक्ष व ग्रामपंचायत शंकरपूरचे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी, संताजी तेली समाज मंडळ चे सदस्य बंडूजी भजनकर, रवींद्र राखडे, रवींद्र भजनकर, कैलास साहारे, सुनील दुरबुडे, किशोर समर्थ, माणिक चौधरी, अनंता ठाकरे, चंद्रभान सहारे, मनोज चौधरी व समाज बांधव उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .